	दाखल दिनांक २०.०२.२०२३
	नोंदणी दिनांक- २०.०२.२०२३
	निकाल दिनांक- ०२.०५.२०२६
	कालावधी - वर्षे ०३ महिने ०२ दिवस. १३

भाग -अ

[परिच्छेद क्र.४४(१), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका]

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात.

(पिठासीन अधिकारी : एस.व्ही.जंगमस्वामी)

नियमीत फौजदारी खटला क्रमांक ३०/२०२३ निशाणी क्र. ३५/ब

न्यायनिर्णय दिनांक : ०२/०५/२०२६	
प्रथम खबर अहवाल/ अपराध क्र. १६५/२०२२	पन्हाळा पोलीस ठाणे, पन्हाळा जि.कोल्हापूर भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२४, ३२३,४५२ आणि ५०६ सह कलम ३४ प्रमाणे
अभियोग पक्ष	महाराष्ट्र सरकार, मार्फत : सहा.पोलिस निरिक्षक पन्हाळा पोलीस ठाणे, ता.पन्हाळा जि.कोल्हापूर.
अभियोग पक्षातर्फे अभियोक्ता	अॅड. एस.एस.गर्जे सहा.सरकारी अभियोक्ता
विरूद्ध	
आरोपी	१.प्रदीप शहाजी पाटील,व.व.३४, धंदा-हॉटेल व्यवसाय, २.श्रीकांत शहाजी पाटील, व.व.३१,धंदा-बेकरी व्यवसाय ३.जयदीप शहाजी पाटील, व.व.३०,धंदा-बेकरी व्यवसाय ४.शहाजी हिंदुराव पाटील, व.व.५९,धंदा- शेती सर्व रा. पोर्ले तर्फे ठाणे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर.
आरोपीतर्फे विधिज्ञ	अॅड. डी.जी.पाटील, विधीज्ञ

भाग -ब

[परिच्छेद क्र.४४(२), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका]

अपराध घडल्याचा दिनांक	११.१२.२०२२
प्रथम खबर अहवाल दिनांक	११.१२.२०२२

चार्जशीट (अंतीम अहवाल) दिनांक	२०.०२.२०२३
दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक	०३.१०.२०२३
पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक	०८.०४.२०२४
न्यायानिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक	०२/०५/२०२६
न्यायनिर्णय दिनांक	०२/०५/२०२६
शिक्षा पारित केल्याचा दिनांक, जर असेल तर	.....

आरोपींचा तपशील

आरोपीचे नांव	अटक दिनांक	जामीनावर सोडल्याचा दिनांक	गुन्हा / आरोप	दोषी किंवा निर्दोष	शिक्षा	आरोपी बंदी अस- लेला कालावधी फौ.प्र.सं.क ४२८नुसार सुट देणेकरीता
१.प्रदीप शहाजी पाटील २.श्रीकांत शहाजी पाटील, ३.जयदीप शहाजी पाटील, ४.शहाजी हिंदुराव पाटील,	फॉर्मल अटक करुन जामीनावर मुक्त	--ल	भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२४, ३२३ ४५२, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे	आरोपींना निर्दोष मुक्त करणेत येते	...	...

भाग -क
[परिच्छेद क्र.४४(३), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका]

अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार :

क्रमांक	नांव	पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप
सा.क्र. १	दिगंबर पांडुरंग भोपळे	फिर्यादी
सा.क्र. २	पांडुरंग ज्ञानदेव भोपळे	जखमी साक्षीदार

सा.क्र. ३	बबन ज्ञानदेव भोपळे	जखमी साक्षीदार

ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :

क्रमांक	नांव	पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप
ब.सा.क्र.१	निरंक	निरंक

क. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :

क्रमांक	नांव	पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप
को.सा.क्र.१	निरंक	निरंक

<u>अभियोग पक्ष / बचाव पक्ष /न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणी</u>

अ. अभियोग पक्ष :

अ.क्र.	निशाणी क्रमांक	वर्णन
१.	निशाणी २८/क	फिर्याद वरील सही

ब. बचाव पक्ष :

अनुक्रमांक	निशाणी क्रमांक	वर्णन
१.	३१/क	घटनास्थळ पंचनामा
२.	३२/क	साक्षीदार पांडुरंग भोपळे याचे वैद्यकिय प्रमाणपत्र
३.	३३/क	साक्षीदार बबन ज्ञानदेव भोपळे वैद्यकिय प्रमाणपत्र

क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणी :-

अनुक्रमांक	निशाणी क्रमांक	वर्णन
१.	निरंक	निरंक

ड. मुद्देमाल :

अनुक्रमांक	मुद्देमाल क्रमांक	वर्णन
१.	६२/२०२२	जखमी पांडुरंग भोपळे याचे रक्ताचा सुकलेला नमुना कापसावर खरडून घेतलेला
२.	६२/२०२२	एक तपिकिरी रंगाचे हाफ बाळ्याचे रंगीत बनीयन त्यावर रक्ताचे डाग असलेले

३.	१/२०२३	एक काळा व राकाडी रंगाचा टी शर्ट हाफ बाह्यांचा
४.	१/२०२३	सुमारे २७ इंच लांबीची एक लोखंडी सळी
५.	१/२०२३	सुमारे ४३ इंच लांबीची एक लोखंडी सळी
६.	१/२०२३	एक काळया रंगाचा पट्टा पुढे बक्कल असलेला ४१ इंच लांबीचा

न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०२/०५/२०२६)

१. प्रस्तुतचा खटला हा आरोपींचे विरूद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२४, ३२३, ४५२ आणि ५०६ सह कलम ३४ प्रमाणे चालविण्यात आला.

अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन -

२. आरोपी व फिर्यादी हे एकाच गावचे राहणारे आहेत. दि.११.१२.२०२२ रोजी ०३.३० वाजणेचे सुमारास पन्हाळा येथील फिर्यादीचे राहते घराचे दारात पोर्ले तर्फे ठाणे, ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथे फिर्यादीचे वडील व जखमी पांडुरंग भोपळे यांना आरोपी क्र. ४ शहाजी पाटील याने फोन करुन "तुला हद्द दाखवून पाहिजे काय ? तु शेतात ये," असे म्हणून शिवीगाळ केली. त्यानंतर दुपारी ०३.३० वाजणेचे सुमारास आरोपी क्र. १ प्रदीप ,आरोपी क्र. २ श्रीकांत, आरोपी क्र. ३ जयदिप आणि आरोपी क्र. ४ शहाजी पाटील यांनी आपसांत संगनमत करुन फिर्यादीचे घरासमोर येवून शिवीगाळ करीत मारहाण करणेचे उद्देशाने आरोपी क्र. १ प्रदिप शहाजी पाटील त्याचे हातात लोखंडी सळी, आरोपी क्र. ४ शहाजी पाटील हा त्याचे हातात काठी आणि आरोपी क्र. २ श्रीकांत पाटील हा हातात बेल्ट घेवून आले. आरोपी क्र. २ ने फिर्यादीस बेल्टने मारहाण केली व आरोपी क्र. ४ याने बबन भोपळे यांना काठीने डावे हाताचे दंडावर मारले आरोपी क्र. ३ याने पुष्पा घाडगे हिस ढकलून देवून शिवीगाळ केली आणि आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे घराचे सोप्यात येवून त्याचे हातातील लोखंडी सळीने फिर्यादीचे वडील पांडुरंग भोपळे यांचे डोकीत मारुन गंभीर जखमी करुन धमकी दिली अशा स्वरुपाची फिर्याद फिर्यादीने पन्हाळा पोलीस ठाणे येथे दाखल केली.

३. फिर्यादीने दाखल केलेल्या फिर्याद वरुन ठाणे अंमलदार यांनी गु.र.नंबर १६५/२०२२ हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास हा पोलिस उप निरिक्षक आर.पी.ठाणेकर यांच्याकडे दिला. त्यानंतर आरोपी क्र.१ प्रदिप शहाजी पाटील याने गुन्हयाचे वेळी त्याच्या अंगात

घातलेले कपडे आणि गुन्हा करताना त्याने व त्याचे वडील शहाजी पाटील आणि त्याचा भाऊ श्रीकांत पाटील यांनी वापरलेली हत्यारे लोखंडी सळी, एक काठी आणि बक्कल असलेला एक काठया रंगाचा पट्टा हे दोन पंचासमक्ष हजर केले आणि त्यांनी ते जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा तयार केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. फिर्यादी व जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले. त्यांनी तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी क्र.१ ते ४ यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२४, ३२३,४५२ आणि ५०६ सह कलम ३४ प्रमाणे निशाणी क्र.१२ अन्वये दोषारोप नोंदविला व निशाणी क्र.१३ ते १६ अन्वये आरोपी क्र.१ ते ४ यांचे निवेदन नोंदविले. त्यामध्ये आरोपींनी गुन्हा अमान्य करुन त्यांचेविरुध्द खटला चालविण्याकामी विनंती केली.

५. अभियोग पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली.

६. आरोपीं विरुध्द अभिलेखावर कोणताही दोषात्मक पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन हे सोडून देण्यात आले.

७. अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता अॅड.एस.एस.गर्जे आणि बचाव पक्षातर्फे विधिज्ञ अॅड डी.जी.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. खटल्याचे निकालासाठी माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले, त्यावर मी नोंदविलेले कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणेः

अ.नं.	मुद्दे	निष्कर्ष
१.	अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की दि.११.१२.२०२२ रोजी दुपारी ०३.३० वाजणेचे सुमारास पन्हाळा येथील पोर्ले तर्फे ठाणे, येथील फिर्यादीचे राहते घराचे दारात ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथे आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीस हातातील लोखंडी सळी,काठी व पट्टयाने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली आणि लोखंडी सळी, काठी व पट्टयाचा सदर गुन्हयात हत्यार म्हणुन वापर केला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये	

	गुन्हा केला ?	**...नकारार्थी.**
२.	अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीस व साक्षीदारास इच्छापुर्वक साधी दुखापत केली व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ?	**...नकारार्थी.**
३.	अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीचे वडीलांना हातातील लोखंडी सळी या घातक हत्याराने डोक्यात मारहाण करुन इच्छापुर्वक जबर दुखापत केली आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ?	**...नकारार्थी.**
४.	अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीला दुखापत हमला किंवा गैरनिरोध करण्याची पूर्व तयारी करून फिर्यादीच्या घरात सोप्यात आत येवून गृहअतिक्रमण केले आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ४५२ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला?	**...नकारार्थी.**
५.	अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाचे पुरःसरनार्थ फिर्यादी व साक्षीदारांना जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ?	**...नकारार्थी.**
६.	कोणता आदेश ?	**...अंतिम आदेशाप्रमाणे**

<u>का र ण मि मां सा</u>

८. अभियोगपक्षाने आरोप सिध्दी पृष्ठर्थ फिर्यादी दिगंबर पांडुरंग भोपळे (सा.क्र.१)

याची साक्ष (निशाणी क्र.२७),जखमी साक्षीदार पांडुरंग ज्ञानदेव भोपळे याची साक्ष (निशाणी क्र.२९) आणि साक्षीदार बबन ज्ञानदेव भोपळे याची साक्ष (निशाणी क्र.३०) वर नोंदविली. फिर्यादी व आरोपी पक्षामार्फत सदर प्रकरणासंदर्भात न्यायालयाबाहेर त्यांची तडजोड झाल्याबाबत तशी तडजोड पुरसीस (निशाणी क्र.२६) वर दाखल करण्यात आली. आरोपी पक्षामार्फत अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.२८) आणि फिर्यादी व जखमी साक्षीदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र. ३२ व ३३) हे मान्य करण्यात आले. त्यानंतर फिर्यादीने आपला पुरावा हा निशाणी क्र. ३४ वर पुरसिस दाखल करुन बंद केला. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा हा निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला.

<u>मुद्दा क्रमांक १ ते ५ बाबत</u> :

९. मुद्या क्रमांक १ ते ५ हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रित चर्चिले आहेत. फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) याने आपल्या पुराव्यात असे सांगितले की, पांडूरंग भोपळे हे त्याचे वडील आणि बबन भोपळे हे त्याचे चुलते आहेत . पुष्पा घाटगे ही त्यांच्या घरासमोर राहते. घटना ही चार वर्षापुर्वी घडली. त्यावेळेस काय घडले होते हे त्याला आठवत नाही. त्याने पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार दाखल केली नव्हती. त्याने फिर्यादवरील त्याची सही ओळखली परंतू फिर्याद मधील मजकुर हा त्याला माहिती नसल्याचे त्याने सांगीतले. त्याने आपल्या पुराव्यात पुढे सांगितले की, दिनांक ११.१२.२०२२ रोजी त्याच्यामध्ये व आरोपीमध्ये शेताच्या कारणावरून भांडणे झाली होती. सदर दिवशी आरोपींनी त्याला व त्याच्या वडीलांना शिवीगाळ केली आणि त्याला आरोपीने बेल्टने मारहाण केली आणि आरोपींनी त्याच्या वडीलांना लोखंडी सळीने मारहाण केली होती व त्याचे चुलते बबन यांना आरोपींनी काठीने मारहाण केली होती. आरोपींनी पुष्पा हिला शिवीगाळ करून मारहाण केली असे काही घडले नाही. त्याने त्याच्या सरतपासा दरम्यान अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला फितुर घोषित करून त्याचा उलटतपास घेतला.

१०. अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान त्याने त्याच्या फिर्याद मधील अधोरेखांकित भाग "अ" मधील मजकुराबाबत त्याला काही माहिती नसून पोलिसांनी तसा मजकूर त्याच्या जबाबात का नमुद केला याचे कारण तो सांगू शकत नाही असे त्याने सांगीतले. त्याने त्याच्या उलटतपासा दरम्यान पुढे असे सांगीतले की सदर प्रकरणा संदर्भात त्याच्यात व आरोपींच्या मध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असून त्यास पुरक अशी तडजोड

पुरसीस निशाणी क्र.२६ नुसार दाखल केली आहे. सदरचे प्रकरण हे तडजोडीने मिटले असल्याने त्याची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नाही.

११. पांडुरंग (सा.क्र.२) हे फिर्यादीचे वडील असून बबन (सा.क्र.३) हे फिर्यादीचा चुलते आहे आणि ते जखमी साक्षीदार आहेत. त्यांनी आपल्या पुराव्यामध्ये असे सांगितले की, त्यांच्यात व आरोपींमध्ये किरकोळ वाद झाले होते. पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला परंतू त्यातील मजकूर हा त्यांना माहिती नाही. दि.११.१२.२०२२ रोजी आरोपींनी त्यांना शिवीगाळ व मारहाण केली असे काही घडले नाही. त्यांनी त्यांच्या सरतपासा दरम्यान अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने त्यांना फितुर घोषित करून त्यांचा उलटतपास घेतला. परंतु उलटतपासा दरम्यान त्यांनी अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य केले नाही. त्यांनी त्याच्या उलटतपासा दरम्यान असे सांगीतले की, सदर प्रकरणा संदर्भात फिर्यादी, त्याच्या व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असून त्या संदर्भात निशाणी क्र. २६ वर तडजोड पुरसीस दाखल केली आहे. त्यांनी त्यांची आता आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नाही असे सांगितले.

१२. अभियोग पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्याने पोलीस ठाण्यात आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार दाखल केली नव्हती. त्याने फिर्याद वरील त्याची सही ओळखली. परंतू फिर्याद मधील मजकुर हा त्याला माहिती नसल्याचे त्याने सांगीतले. त्याने दिनांक ११.१२.२०२२ रोजी त्याच्यामध्ये व आरोपीमध्ये शेताच्या कारणावरून भांडणे झाली होती. सदर दिवशी आरोपींनी त्याला व त्याच्या वडीलांना शिवीगाळ केली आणि त्याला आरोपीने बेल्टने मारहाण केली आणि आरोपींनी त्याच्या वडीलांना लोखंडी सळीने मारहाण केली होती व त्याचे चुलते बबन यांना आरोपींनी काठीने मारहाण केली होती. आरोपींनी पुष्पा हिला शिवीगाळ करून मारहाण केली असे काही घडले नाही असे सांगीतले. तसेच त्याने फिर्याद मधील मजकूर हा त्याला माहिती नसल्याचे सांगितले. तो फितुर साक्षीदार आहे. त्याने अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये सदर प्रकरणा संदर्भात त्याच्यामध्ये व आरोपींमध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचे सांगितले आणि त्याची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे सांगीतले.

१३. पांडुरंग आणि बबन (सा.क्र.२ व ३) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्यात व आरोपींमध्ये किरकोळ वाद झाले होते. पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला परंतू

त्यातील मजकूर माहिती नाही. दि.११.१२.२०२२ रोजी आरोपींनी त्यांना शिवीगाळ व मारहाण केली असे काही घडले नसल्याचे सांगितले. ते फितुर साक्षीदार आहेत. त्यांनी अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये सदर प्रकरणा संदर्भात त्यांचेत व आरोपींची कोर्टा बाहेर तडजोड झाल्याचे सांगितले आणि त्याची आरोपीं विरुध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे सांगीतले.

१४. आरोपी पक्षामार्फत अभिलेखावरील घटनास्थळ (निशाणी क्र.३१) आणि फिर्यादी व जखमी साक्षीदार याचे वैद्यकिय प्रमाणपत्र (निशाणी क्र.३२ ते ३३) हे मान्य केले. परंतू फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१), पांडुरंग (सा.क्र.२) आणि बबन (सा.क्र. ३) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान आरोपींनी त्यांना कोणतीही मारहाण केली नाही असे सांगीतले. त्यामुळे वैद्यकिय प्रमाणपत्रामधील नमुद जखमा या आरोपींनी फिर्यादीला व जखमी साक्षीदारांना मारहाण केल्यामुळे झाल्या असे म्हणता येत नाही.

१५. अभियोग पक्षामार्फत तपासणेत आलेल्या फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) आणि पांडुरंग (सा.क्र.२) आणि बबन (सा.क्र. ३) हे फितुर साक्षीदार असून त्यांनी त्यांचे उलटतपासा दरम्यान सदर प्रकरणा संदर्भात त्यांचेमध्ये व आरोपींमध्ये तडजोड झाली असून सदरचे प्रकरण हे तडजोडीने कोर्टाबाहेर मिटल्याचे सांगितले. त्यास पुरक अशी तडजोड पुरसीस (निशाणी क्र.२६) ही फिर्यादी व आरोपी पक्षामार्फत दाखल करण्यात आली. फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१) आणि पांडुरंग (सा.क्र.२) आणि बबन (सा.क्र. ३) यांचा पुरावा आणि तडजोड पुरसीस (निशाणी क्र.२६) यांचे एकत्रित अवलोकन केले असता सदर प्रकरण संदर्भात फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये सदरचे प्रकरण हे तडजोडीने मिटल्याचे दिसून येते. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेल्या साक्षीदार क्र.१ ते ३ यांचा पुरावा हा आरोपींविरूद्ध लावलेल्या गुन्हयातील घटकांची सिध्दता होणेकामी तुटपुंज्या स्वरूपाचा दिसून येतो.

१६. एकुणच वरील सर्व बाबींचा उहापोह केला असता अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेले फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१),पांडुरंग (सा.क्र.२) आणि बबन (सा.क्र. ३) हे फितुर साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात दरत्यान सदर प्रकरणा संदर्भात त्यांच्यात व आरोपींमध्ये सदरचे प्रकरण हे कोर्टाबाहेर तडजोडीने मिटल्याचे सांगितले. तसेच त्यास पुरक अशी तडजोड पुरसीस ही (निशाणी क्र.२६) वर दाखल केली. त्यामुळे फिर्यादी दिगंबर (सा.क्र.१), पांडुरंग (सा.क्र.२) आणि बबन (सा.क्र. ३) यांचा पुराव्याचे आणि तडजोड पुरसीसचे एकत्रित अवलोकन केले असता सदर प्रकरणा संदर्भात फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये तडजोडीने सदरचे प्रकरण मिटल्याचे दिसून

येते. त्यामुळे साक्षीदार क्र.१ ते ३ यांचा पुरावा हा आरोपीं विरूद्ध लावलेले आरोप शाबीत करण्याकरीता तुटपुंज्या स्वरूपाचा दिसून येतो. त्यामुळे अभियोग पक्षाने लावलेले आरोप हे संशयापलीकडे जावुन सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे संशयाचा फायदा हा आरोपींना देणे न्यायोचित होणार आहे. अभियोगपक्ष हा आरोपीं विरूध्द लावलेले भारतीय दंड संहिता कलम ३२६,३२४,३२३,४५२, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे अन्वयेचे आरोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला. सबब मी मुद्दा क्र. १ ते ५ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

१७ जप्त मुद्देमाल जखमी पांडुरंग भोपळे याचे रक्ताचा सुकलेला नमुना कापसावर खरडून घेतलेला, एका तपकिरी रंगाचे हाफ बाहयाचे रंगीत बनीयन, एक काळा व राकाडी रंगाचा टी शर्ट हाफ बाह्यांचा, सुमारे २७ इंच लांबीची एक लोखंडी सळी, सुमारे ४३ इंच लांबीची एक लोखंडी सळी, एक काळया रंगाचा पट्टा पुढे बक्कल असलेला ४१ इंच लांबीचा हे उपयोगहीन व मुल्यहीन असल्याने ते अपिल कालावधी नंतर नियमा नुसार नाश करण्यात यावेत.

<u>मुद्या क्रमांक ६ बाबतः</u>

मुद्या क्रमांक १ ते ५ च्या नकारार्थी निष्कर्षावरून मी मुद्दा क्रमांक ६ च्या उत्तरा दाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

<u>आदेश</u>

१. आरोपी क्र.१.प्रदीप शहाजी पाटील, आरोपी क्र.२. श्रीकांत शहाजी पाटील, आरोपी क्र.३. जयदीप शहाजी पाटील आणि आरोपी क्र.४. शहाजी हिंदुराव पाटील, यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता कलम ३२६,३२४, ३२३,४५२ आणि ५०६ सह कलम ३४ प्रमाणे च्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल जखमी पांडुरंग भोपळे याचे रक्ताचा सुकलेला नमुना कापसावर खरडून घेतलेला, एका तपकिरी रंगाचे हाफ बाहयाचे रंगीत बनीयन, एक काळा व राकाडी रंगाचा टी शर्ट हाफ बाह्यांचा, सुमारे २७ इंच लांबीची एक लोखंडी सळी, सुमारे ४३ इंच लांबीची एक लोखंडी सळी, एक काळया रंगाचा पट्टा पुढे बक्कल असलेला ४१ इंच लांबीचा हे उपयोगहीन व मुल्यहीन असल्याने ते अपिल कालावधी नंतर नियमा नुसार नाश करण्यात यावेत.

३. आरोपी क्रमांक १ ते ४ यांचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

४. आरोपी क्रमांक १ ते ४ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये ७,५००/- इतक्या रकमेचा वैयक्तीक जात मुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by SONALI VIJAYKUMAR JANGAMSWAMI
Date: 2026.05.02 12:23:39 +0530

एस.व्ही.जंगमस्वामी,
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा
जिल्हा - कोल्हापूर

ठिकाण : पन्हाळा
दिनांक :०२.०५.२०२६.